**<u>अंतिम हुकूमनामा क्रमांक ७/२०१७ मधील</u>**
**<u>अर्ज (निशाणी क्रमांक ५) वरील आदेश</u>**
(सीएनआर नं.एमएचएएच०८-००१२१२-२०१७)

प्रस्तुत अर्ज न्यायालयीन आयुक्त नेमण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२. अर्जदाराने असे नमुद केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज रे.मु.नं.१३२/२०१२ मधील हुकूनाम्यानुसार दावा मिळकतीचे वाटप होण्याकरीता दाखल केलेला आहे. अर्ज कलम १ ही घर मिळकत असुन तिच्या वाटपाकरीता न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक करण्यात यावी व वाटप होवुन स्वतंत्र कब्जा मालकी हक्काने मिळावा.

०३. गैरअर्जदार क्र.७ यांनी नि.क्र.३६ प्रमाणे म्हणणे दाखल करून अर्जाचा विरोध केलेला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, फार तर प्राथमिक गरजेकरीता न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक करून कमिशनर यांनी हुकूमनाम्याप्रमाणे वादीच्या हिश्याबाबत अहवाल अगोदर सादर करावा व तो सर्व पक्षकारांना मान्य झाला तर व न्यायालयाने मान्यता दिल्यानंतर कब्जाची कारवाई होवु शकते. त्यामुळे कब्जाचा हुकूम आता करता येणार नाही. फार तर कमिशनर यांनी वाटप कसे करता येईल ? या बाबत अहवाल दयावा. तसेच झालेल्या हुकूमनाम्याविरूद्ध मा. जिल्हा न्यायालयात रे. अपिल क्र.८५/२०१६ प्रलंबित असल्याचा विचार देखील व्हावा असे नमुद केलेले आहे.

०४. अर्जदार व सामनेवाला क्र.७ यांच्यातर्फे वकिलांचे म्हणणे ऐकले. प्रस्तुत फायनल डिक्री अर्ज रे.मु.नं.१३२/२०१२ मधील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरीता करण्यात आलेला आहे. सदर हुकूमनाम्याचे अवलोकन करता असे दिसते की, सदर दाव्यामध्ये कलम १ मध्ये नगरपालिका घर क्र.३६५ ही दावा मिळकत नमुद करण्यात आलेली आहे. त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांना हिस्सा जाहीर करण्यात आलेला आहे. सदर हुकूमनाम्याविरूद्ध अपिल दाखल झाले असल्याचे मान्य केले तरी देखील आज अखेर सदर हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरीता कोणतीही स्थगिती नाही. त्यामुळे त्या कारणाने न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक नाकारता येणार नाही. सदर घर मिळकतीचे वाटप होण्याकरीता प्रथमत: न्यायालयीन आयुक्तांनी वाटप सुचविणे आवश्यक आहे. त्यानंतर स्वतंत्र कब्जा देण्याबाबत विचार करणे योग्य ठरेल. सबब, रे.मु.नं.१३२/२०१२ मध्ये आदेश करण्यात आल्यानुसार घर मिळकतीचे वाटप सुचविण्याकरीता ॲड. वाय. बी. हासे यांची नेमणुक करण्यात येत आहे. त्यांनी वर नमुद हुकूमनाम्यानुसार मिळकतीचे वाटप सुचवणारा

अहवाल सादर करावा. त्याकरीता सदर न्यायालयीन आयुक्तांना पत्र द्यावे. अर्जदारांनी न्यायालयीन आयुक्त यांची फी रक्कम रूपये २,५००/- जमा करावी. अर्जदाराने न्यायालयीन आयुक्तांना देण्याकरीता आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती दाखल कराव्यात.

MANSOOR MAHAMOOD SHAIKH

Digitally signed by MANSOOR MAHAMOOD SHAIKH
Date: 2022.10.07 13:53:00 +0530

संगमनेर.
दिनांक :- ०७.१०.२०२२.

(एम. एम. शेख)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
संगमनेर.